RESEARCH NEBULA
AN INDEXED, REFERRED & PEER REVIEWED JOURNAL

J-Gate INDEXED

ISSN 2277-8071

Indexed in the ICI Journals Master List

INDEX COPERNICUS INTERNATIONAL

# RESEARCH NEBULA

*An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences*

**DOI PREFIX 10.22183** **JOURNAL DOI 10.22183/RN** **IMPACT FACTOR 7.399**

## TWO - DAY 47th ANNUAL CONFERENCE OF

## VIDHARBHA ARTHASHASTRA PARISHAD

**3rd & 4th February, 2024**

***Organized by***

# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

**MIDC Road Complex, Gadchiroli-442605, MH. (India)**

**Guest Editor**
**Dr. Shriram Kawale**
Pro Vice – Chancellor,
Gondwana University,
Gadchiroli.

**Executive Editor**
**Dr. Shilpa Athawale**
Coordinator, PGTD of Applied Economics,
Gondwana University,
Gadchiroli.

**Special Issue Published on 3rd February, 2024**
www.ycjournal.net

Scholarsteer Scholarly Information
DataCite FIND, ACCESS, AND REUSE DATA
JIF GLOBAL SOCITY FOR SCIENTIFIC RESEARCH

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

INTERNATIONAL STANDARD SERIAL NUMBER INDIA
ISSN 2277-8071


| S.N | Author(s) | Title | Page |
|---|---|---|---|
| 1. | **H.A. HUDDA**<br>Retired Professor,<br>Vasantrao Naik, Government Institute of Arts and Social Sciences, Nagpur | Changing Theory of Economic Models | 24 |
| 2. | **DR. SAMIT MAHORE**<br>Associate Professor,<br>Department of Economics<br>Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur | Changing Nature of Development Theories – A Review | 29 |
| 3. | **DR. ROSALIN MISHRA**<br>Associate Professor and Head,<br>Department of Economics,<br>L.A.D and S.R.P College, Nagpur | Non-Performing Assets – Causes And Its Effect On Indian Economy | 36 |
| 4. | **डॉ. राजू घनश्याम श्रीरामे**<br>उपप्राचार्य तथा पदवी व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग प्रमुख, अंत्योदय महाविद्यालय, देवग्राम<br>त. नरखेड जि. नागपूर | आर्थिक विकास सिद्धांत: महायुद्धोत्तर विकास विषयक सिद्धांतातील स्थित्यंत्तरे | 40 |
| 5. | **प्रा.डॉ. श्रीकृष्ण बी.बोढे**<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख,<br>रा.सु.बिडकर महाविद्यालय, हिंगणघाट, जी.वर्धा | विकास सिद्धांताचे बदलते स्वरूप : एक आर्थिक दृष्टीकोन | 56 |
| 6. | **प्रशांत हरमकर**<br>सहयोगी प्राध्यापक, या.द.व. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,तिवसा, जि. अमरावती | विकासाची संकल्पना : शक्तता दृष्टीकोन | 60 |
| 7. | **प्रा. डॉ. सतीश राणे**<br>सहाय्यक प्राध्यापक,<br>कला व वाणिज्य महाविद्यालय, वरवट बकाल, जी. बुलडाणा. | विकास सिद्धांताचे बदलते स्वरूप | 68 |
| 8. | **डॉ. महिंद्र नारायण वर्धलवार**<br>सहाय्यक प्राध्यापक,<br>पदव्युत्तर शैक्षणिक उपयोजित अर्थशास्त्र विभाग,<br>गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली | विकास सिद्धांतांचे बदलते स्वरूप आणि भारत: एक चिकित्सक अध्ययन | 72 |
| 9. | **प्रा.डॉ. विशाल वा. मालेकार**<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>प्रभाकरराव मामुलकर महाविध्यालय,<br>कोरपणा जि. चंद्रपुर | विकास सिद्धांताचे बदलते स्वरूप | 81 |

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071


| | | | |
|---|---|---|---|
| 10. | **PRIYANKA RUPALAL DAKAHA**<br>Student of Economics Department,<br>RTM Nagpur University,<br>Nagpur | The Changing Nature of Development Theory After Covid-19 | 87 |
| 11. | **DR. ISHWAR WAGH**<br>Assistant Professor,<br>Smt. Rajkamal baburao Tidke<br>Mahavidyalaya, Mouda. | The Visioner - Dr. Punjabro Deshmukh | 92 |
| 12. | **प्रा.डॉ.नीता नंदलाल तिवारी**<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख,<br>श्री धाबेकर कला महाविद्यालय,खडकी,अकोला | डॉ. पंजाबराव देशमुख के आर्थिक विचार | 95 |
| 13. | **डॉ. विजय के. बनसोड**<br>प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>डॉ. एम. के. उमाठे कॉलेज, नागपूर | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान | 99 |
| 14. | **डॉ. राजेंद्रकुमार रामराव गव्हाळे**<br>प्राध्यापक तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख, जी. एस. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय,<br>खामगांव, जि. बुलढाणा<br>**डॉ. दिलीप पांडुरंग महाजन**<br>प्राध्यापक तथा विभाग प्रमुख, एस. पी. एम. तात्यासाहेब महाजन कला व वाणीज्य महाविद्यालय,<br>चिखली, जि.बुलढाणा | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे शेतीपूरक जोडधंद्यासबंधी आर्थिक विचार | 104 |
| 15. | **डॉ.हनुमंत अंकुशराव भोसले**<br>सहाय्यक प्राध्यापक,<br>पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग जी.एस कॉलेज, खामगाव<br>**डॉ प्रदिप विठ्ठलराव ताकतोडे**<br>सहाय्यक प्राध्यापक,अर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>कला महाविद्यालय, मलकापूर अकोला<br>**डॉ; नितीन ज्ञानदेव चौधरी**<br>सहाय्यक प्राध्यापक, विभाग प्रमुख<br>पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग<br>श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय अकोला | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक विचार | 110 |
| 16. | **प्रा.डॉ. सुभाष रामचंद्र गुर्जर**<br>कला व वाणिज्य महाविद्यालय, वरवट बकाल, जि. बुलढाणा | डॉ.पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार व सामाजिक क्षेत्रातील योगदान | 116 |

| | | | |
|---|---|---|---|
| 17. | **डॉ.हनुमंत अंकुशराव भोसले**<br>सहाय्यक प्राध्यापक,<br>पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग जी.एस कॉलेज, खामगाव<br>**डॉ संजय तुकाराम वराडे**<br>प्राध्यापक,<br>पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग जी.एस कॉलेज, खामगाव<br>**डॉ. नितीन ज्ञानदेव चौधरी**<br>सहाय्यक प्राध्यापक व प्रमुख<br>पदवी व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग<br>श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय अकोला | डॉ पंजाबराव देशमुख: दुरदृष्टी असलेला सुधारणावादी नेता | 120 |
| 18. | **प्रा.सतीश आर.जाधव**<br>अर्थशास्त्र विभाग, न.प.शिवाजी महा. मोवाड,तह-नरखेड | डॉ.पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख यांचे सामाजिक व आर्थिक योगदान | 126 |
| 19. | **डॉ. गजानन सोमकुवर**<br>सहयोगी प्राध्यापक अर्थशास्त्र विभागप्रमुख<br>बॅरि. शेषराव वानखडे कला वाणिज्य महाविद्यालय खापरखेडा | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रातील योगदान | 131 |
| 20. | **डॉ. उषा एन. पाटील**<br>प्रोफेसर व अर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>गोपिकाबाई सिताराम गावंडे महाविद्यालय उमरखेड | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक आर्थिक विचार- एक विश्लेषण | 136 |
| 21. | **डॉ.आरती डी. महेशकर,**<br>सहा. प्राध्यापक, भगवंतराव कला महाविद्यालय,<br>सिरोंचा, जिल्हा. गडचिरोली | डॉ.पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान | 140 |
| 22. | **डॉ. हरिष एम. बावनगडे** | डॉ.पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक विचार | 144 |
| 23. | **डॉ. कुमुदिनी भाऊराव जोगी,**<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख, जगदंब महाविद्यालय,अचलपुर | डॉ.पंजाबराव देशमुख यांचे भारताच्या कृषिविकासातील योगदान | 149 |
| 24. | **पंकज तायडे,**<br>सहयोगी प्राध्यापक,<br>भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज, पिंजर, अकोला | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषि कर्ज लवाद धोरण | 155 |
| 25. | **डॉ. संजय जे. कोठारी,**<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख,<br>गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,<br>चांदूर बाजार, जि. अमरावती | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषि धोरण आणि शेतकऱ्यांचा आर्थिक विकास | 161 |

| | | | |
|---|---|---|---|
| 26. | **डॉ. आर .जी. टाले**<br>प्राचार्य, बॅरिस्टर शेषराव वानखेडे, महाविद्यालय, खापरखेडा. तहसील- सावनेर, जिल्हा - नागपुर<br>**डॉ. सुनील घुगल**<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख, तायवाडे कॉलेज, कोराडी. तहसील- कामठी , जिल्हा -. नागपुर | डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शैक्षणिक, कृषी, आर्थिक, व सामाजिक कार्यांचा विश्लेषणात्मक अभ्यास | 166 |
| 27. | **डॉ. रमेश बिडवाई**<br>सेवानिवृत्त प्र.पाठक,गोपिकाबाई सिताराम गावंडे महाविद्यालय, उमरखेड जिल्हा.- यवतमाळ | डॉक्टर पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान | 174 |
| 28. | **पंढरी गंगाधर मोरे**<br>प्राचार्य, अरूणराव कलोडे महाविद्यालय, नागपूर | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान | 180 |
| 29. | **डॉ. रंजना एस. लांजेवार**<br>राणी लक्ष्मीबाई महिला, महाविदयालय, ता. नरखेड जि.नागपूर | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान | 185 |
| 30. | **प्रा. डॉ. अनिल दिगंबर वाडकर**<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख, श्री कुमारस्वामी महाविद्यालय औसा,जिल्हा, लातूर. महाराष्ट्र. | डॉ.पंजाबराव देशमुख यांचे अर्थशास्त्रातील योगदान | 189 |
| 31. | **राजेश्वर वारलु काकडे**<br>संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग नेवजाबई हितकरणी महाविद्यालय, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर | डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू | 198 |
| 32. | **प्रा.डॉ.व्ही.एन.ठावरी**<br>कला व वाणिज्य महाविद्यालय भिसी, ता.चिमूर, जि.चंद्रपूर | डॉ.पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान | 202 |
| 33. | **डॉ.मुकुंद रामदास दातीर,**<br>जगदंब महाविद्यालय अचलपूर शहर ,जिल्हा अमरावती. | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार | 206 |
| 34. | **डॉ. सुनिल शिंदे**<br>अर्थशास्त्र विभागप्रमुख, भिवापूर महाविद्यालय, भिवापूर जि. नागपूर | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक आर्थिक विचार - एक अवलोकन | 211 |
| 35. | **डॉ. गजानन भारती,**<br>सहयोगी प्राध्यापक, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती | डॉ. पंजाबरावांचे शेती, शिक्षण व महिला विकासातील योगदान | 215 |

| | | | |
|---|---|---|---|
| 36. | **अभिषेक संजय पद्मावार,**<br>रा.तू.म.नागपूर विद्यापीठ,नागपूर,<br>**डॉ करमसिंग राजपूत**<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख,<br>लोकमान्य टिळक महाविद्यालय,<br>वणी जि यवतमाळ | डॉ .पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक आर्थिक विचार | 221 |
| 37. | **श्रीमती वैशाली रमेश नंदुरकर,**<br>विद्यार्थी , सरदार पटेल महाविद्यालय,चंद्रपूर. | डॉक्टर पंजाबराव देशमुख यांच्या आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान | 225 |
| 38. | **डॉ.शरयू मनिष पोतनुरवार**<br>सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख,<br>सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक, सामाजिक आणि कृषी क्षेत्रातील योगदान | 228 |
| 39. | **डॉ. विठ्ठल मा. घिनमिने**<br>सहयोगी प्राध्यापक अर्थशास्त्र<br>श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय,<br>वडणेर ता. हिंगनघाट जिल्हा. वर्धा<br>**सुरज संघरक्षित पोपटकर**<br>संशोधक विद्यार्थी, श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय,वडणेर ता. हिंगनघाट जिल्हा. वर्धा | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषि क्षेत्रातील योगदान | 233 |
| 40. | **डॉ. विष्णु पांडुरंग कुटे**<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख,<br>नेहरू विद्यालय, नेर परसोपंत, जि. यवतमाळ | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान | 238 |
| 41. | **डॉ. हितेश माणिक दडमल**<br>सहाय्यक प्राध्यापक (अर्थशास्त्र विभाग),<br>राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर<br>**डॉ. रवींद्र बापूराव शेंडे**<br>सहयोगी प्राध्यापक (अर्थशास्त्र विभाग),<br>लोकमान्य महाविद्यालय, वरोरा, जिल्हा चंद्रपूर | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सकारात्मक विकासासाठी धाडसी पाऊल : एक सर्वसमावेशक लोककल्याणात्मक दृष्टिक्षेप | 242 |
| 42. | **डॉ. महेंद्र पांडुरंगजी गावंडे,**<br>नारायणराव काळे स्मृति मॉडेल कॉलेज,<br>कारंजा(घा.), जि. वर्धा | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषीविषयक विचार | 252 |
| 43. | **डॉ.दिपक के.राऊत,**<br>अर्थशात्र विभाग प्रमुख, सरस्वती कला महाविद्यालय,<br>दहीहांडा,ता.जि.अकोला | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान | 258 |

| | | | |
|---|---|---|---|
| 44. | **विशाल मोकाशे,**<br>संशोधक अर्थशास्त्र विभाग,<br>आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे<br>**डॉ. दीपक शृंगारे,**<br>प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे | डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या विचारातील आर्थिक धोरण | 264 |
| 45. | **प्रा. डॉ. वर्षा गंगणे**<br>एम. बी. पटेल कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय देवारी, जि. गोंदिया | पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान | 269 |
| 46. | **डॉ विष्णू एकनाथ घुमटकर**<br>सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>श्रीमती सु. रा मोहता महिला महाविद्यालय<br>खामगाव | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे शेती व शेतकरी विषयक विचार | 273 |
| 47. | **डॉ. कविता एन. मालोकार (हिरूळकर),**<br>प्राध्यापक (अर्थशास्त्र विभाग प्रमुख), श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगांव सुर्जी, जिल्हा अमरावती, जि. अमरावती | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान | 277 |
| 48. | **डॉ. गजानन पाटील,**<br>प्राचार्य, अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय, नागपूर<br>**डॉ. सारिका गजानन पाटील** | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी क्षेत्रातील योगदान | 282 |
| 49. | **सागर शंकर बरशेट्टीवार,**<br>आचार्य पदवी संशोधक विद्यार्थी, अमरावती विद्यापीठ<br>**प्रा. डॉ. करमसिंग रा. राजपूत**<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख,<br>लोकमान्य टिळक महाविद्यालय,<br>वणी जि यवतमाळ | कृषी क्रांती चे अग्रदूत : डॉ. पंजाबराव देशमूख | 288 |
| 50. | **डॉ. सिद्धार्थ हरिदास मेश्राम**<br>सहयोगी प्राध्यापक (अर्थशास्त्र विभाग)<br>सेठ केसरीमल पोरवाल कला आणि विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, कामठी, जि.<br>**डॉ. धीरज सुभाषराव कदम**<br>सहाय्यक प्राध्यापक,पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग<br>राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | वर्तमान कृषी अरीष्टांच्या संदर्भात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कृषीविषयक विचारांची प्रासंगिकता | 292 |

| | | | |
|---|---|---|---|
| 51. | **डॉ. दयाळू राठोड**<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख,<br>संत गजानन महाराज महाविद्यालय,बोरगाव मंजू,<br>ता.जि.अकोला. | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक विचार | 302 |
| 52. | **RUPESHKUMAR RAUT**<br>Statistical Officer, District Statistical Office, Gondia, Maharashtra<br>**DR. SHARYU POTNURWAR**<br>Associate Professor and HoD (Economics), Sardar Patel Mahavidyalaya, Chandrapur, Maharashtra | **Study Of Industrial Development In Vidarbha And Credit Potential By Nabard For Msmes In Chandrapur District** | 306 |
| 53. | **डॉ. नरेंद्र केशव पाटील**<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख,<br>आनंद निकेतन महाविद्यालय, आनंदवन, वरोरा | चंद्रपूर जिल्ह्यातील औद्योगिक विकास - एक चिकित्सक विश्लेषण | 312 |
| 54. | **प्रा. डॉ. रवी एस. सोरते,**<br>श्री पंढरीनाथ महाविद्यालय, नरखेड. जि. नागपूर | चंद्रपूर जिल्ह्यातील औद्योगिक विकास : सर्वसमावेशक विश्लेषण | 318 |
| 55. | **डॉ. लिलाधर खरपुरिये**<br>बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय<br>मोहपा, तह.- कळमेश्वर, जिल्हा- नागपूर | नागपूर जिल्ह्याचा औद्योगिक विकास : एक दृष्टिक्षेप | 325 |
| 56. | **डॉ. रमेश बिडवाई**<br>सेवानिवृत्त प्र.पाठक,<br>गोपिकाबाई सिताराम गावंडे महाविद्यालय, उमरखेड,<br>जिल्हा.- यवतमाळ | विदर्भातील औद्योगिक विकास जिल्हा निहाय (यवतमाळ जिल्हा विशेष) | 331 |
| 57. | **प्रा .डॉ .प्रमोद . घोनमोडे**<br>राजे वि कला-वाणिज्य महा. भामरागड जि.-गडचिरोली . | विदर्भातील औद्योगिक विकास जिल्हा निहाय: यवतमाळ जिल्हा विशेष | 337 |
| 58. | **डॉ. प्रसन्नजीत रामकृष्ण गवई,**<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख,<br>सीताबाई कला, वाणिज्य विज्ञान महाविद्यालय<br>अकोला | अकोला जिल्ह्याचा औद्योगिक विकास: एक विश्लेषणात्मक विवेचन | 340 |
| 59. | **प्रियंका संतोष डोईफोडे**<br>संशोधक विद्यार्थी<br>सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोला.<br>**प्रा.डॉ. प्रसन्नजीत रा. गवई,**<br>मार्गदर्शक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख,<br>सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोला. | अकोला जिल्ह्यातील सोयाबीन पीक उत्पादनाचे औद्योगिक विकासात योगदान | 343 |

| | | | |
|---|---|---|---|
| 60. | **शुभम विठ्ठल खराटे**<br>संशोधक<br>**प्रा. डॉ -प्रसन्नजीत रा .गवई,**<br>मार्गदर्शक, संशोधन केंद्र,अर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय अकोला | अकोला जिल्ह्याच्या औद्योगिक विकासात जलप्रकल्पांचे महत्व | 349 |
| 61. | **डॉ. रामदास य. माहोरे**<br>माजी अध्यक्ष, विदर्भ अर्थशास्त्र परिषद,<br>प्राध्यापक आणि माजी विभागप्रमुख,<br>पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,<br>राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर<br>**डॉ. समित माहोरे**<br>सहयोगी प्राध्यापक, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,<br>राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर | विदर्भातील जिल्हा निहाय औद्योगिक विकास | 354 |
| 62. | **डॉ. अनंता श. गावंडे**<br>सहा. प्राध्यापक,<br>पदव्युत्तर शैक्षणिक उपयोजित अर्थशास्त्र विभाग<br>गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली | गडचिरोली जिल्हयाचा औद्योगिक विकास : एक विश्लेषणात्मक अध्ययन | 364 |
| 63. | **विलास मा .नागोसे**<br>संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग,<br>आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे<br>**प्रा.डॉ .दिपक शृंगारे**<br>प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>आदर्श महाविद्यालय,धामणगाव रेल्वे | विदर्भातील औद्योगिक विकासाच्या संधी व आव्हाने | 371 |
| 64. | **शेखर बी भोंगे**<br>संशोधक विद्यार्थी,आदर्श महाविद्यालय धामणगाव रेल्वे<br>**डॉ. दीपक के. शृंगारे**<br>प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>आदर्श महाविद्यालय धामणगाव रेल्वे | विदर्भातील रेशीम उद्योग एक दृष्टीक्षेप | 377 |
| 65. | **कु. श्रेया रविंद्रराव देशमुख**<br>संशोधक,एम.ए.अर्थशास्त्र, एम.फिल.<br>श्री शिवाजी कला व वाणिज्य महा. अमरावती<br>**प्रा.डॉ.के.व्ही. साबळे**<br>मार्गदर्शक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख,<br>श्री शिवाजी कला व वाणिज्य महा. अमरावती | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत रेशीम उद्योगाला चालना : एक अध्ययन (विशेष संदर्भ अमरावती जिल्हा) | 382 |

| | | | |
|---|---|---|---|
| 66. | **डॉ. धैर्यशील ब. खामकर,**<br>सहाय्यक प्राध्यापक,<br>पदव्युत्तर शैक्षणिक उपयोजित अर्थशास्त्र विभाग,<br>गोंडवाना विद्यापीठ,<br>गडचिरोली | गडचिरोलीतील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या मागील चार वर्षातील औद्योगिक विकासाच्या कामगिरीचा आढावा | 387 |
| 67. | **डॉ .सुरेखा केशवराव हजारे,**<br>सहाय्यक प्राध्यापक,<br>उपयोजित अर्थशास्त्र पदव्युत्तर विभाग ,<br>गोंडवाना विद्यापीठ.गडचिरोली , | मोहफुल प्रक्रिया उद्योगातून गडचिरोली जिल्ह्याच्या विकासाला चालना | 393 |
| 68. | **प्रवीण यादव मुंजमकर**<br>संशोधक, गोंडवाना विद्यापीठ.गडचिरोली ,<br>**डॉ. नितीन बी. कावडकर**<br>मार्गदर्शक, सहयोगी प्राध्यापक , व अर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>चिंतामणी महाविद्यालय घुगुस, चंद्रपूर.<br>गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली. | विदर्भातील गडचिरोली जिल्ह्याचा औद्योगिक विकास | 399 |
| 69. | **प्रा.डॉ.मनिषकुमार काशिनाथ कायरकर**<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>कला वाणिज्य महिला महाविद्यालय, बल्लारपूर | चंद्रपूर जिल्ह्यातील एमआयडीसी परिक्षेत्रातील औद्योगिक विकास | 404 |
| 70. | **डॉ. एम. के. नन्नावरे**<br>सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,<br>पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,आकोट जि. अकोला (महाराष्ट्र) | गडचिरोली जिल्ह्यातील औद्योगिक विकासाचे वास्तव उपयोजन | 411 |
| 71. | **MR. VIJAY P RAHANGDALE**<br>Assistant Prof. & Head, Dept. of Economics,<br>A.D.M Bharsingi, Dist. Nagpur | Economic Development Theory and Its Present Relevance To India | 415 |
| 72. | **प्रा. डॉ.सुनिता कलाखे,**<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख,<br>श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय,<br>चिखली जिल्हा बुलढाणा. | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सहकार क्षेत्रातून शेतकऱ्यांच्या आर्थिक समृद्धीचे योगदान. | 424 |

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

*Two - Day 47th Annual Conference of* Vidharbha Arthashastra Parishad
@ Gondwana University, Gadchiroli.
3rd & 4th February, 2024

**डॉ. सुनिल शिंदे,**
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
भिवापूर महाविद्यालय,
भिवापूर जि. नागपूर

# डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक आर्थिक विचार - एक अवलोकन

***ABSTRACT***

**महाराष्ट्रातील** अग्रक्रन्य राजकारणी, समाजसेवक आणि कृषी क्षेत्राचे सखोल ज्ञान असलेले एक महान व्यक्तिमत्व डॉ. पंजाबराव देशमुख उर्फ भाऊसाहेबांचे जीवन म्हणजे कृषी आणि शेतक-यांच्या विकासासाठी केलेल्या क्रांतीचे महापर्व होय. त्यांच्या या महान व कृषी व शेतक-यांसाठी केलेल्या कार्याचा गौरव करतांना भारत सरकारने १९८६ मध्ये त्यांना 'कृषिरत्न' या पदवीने मरणोत्तर विभूशित केले. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक कार्याची व्याप्ती ही सखोल असून प्रस्तुत लेखामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक आर्थिक विचार यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. डॉ. पंजाबराव देशमुख शेतकरी पुत्र आणि स्वतंत्र भारताचे पहिले कृषीमंत्री होते. त्यांनी संपूर्ण आयुष्यात कृषी आणि शेतक-यांसाठी उल्लेखनिय असे कार्य केलेले आहे. यामध्ये प्रामुख्याने कृषी आणि शेतक-यांच्या विकासासाठी राबविलेले धोरण, शेतक-यांच्या विकासाच्या दृष्टीने स्थापन केलेल्या विविध संस्था, या संस्थाच्या माध्यमातून केलेले कार्य, कृषीमंत्री म्हणून केलेले कार्य, भारत कृषक समाजाची स्थापना करून या माध्यमातून केलेले कार्य, शेतीचा विकास आणि उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने आधुनिक आणि तांत्रिक शेती संदर्भातील सुचविलेल्या उपाययोजनां यासंदर्भात विश्लेषण करण्यात आलेले आहे

**प्रस्तावना**

'कृषी' हा भारतीय अर्थव्यवस्थेच्या पाठीचा कणा असणा-या देशाला आजही डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक विचारांचे महत्वपूर्ण योगदान आहे. भारतीय शेतकरी हा निर्धन, गरीब आणि अंधश्रध्दा, रूढी आणि सामाजिक चालिरितीच्या विळख्यात सापडलेला आहे. आर्थिक महासत्तेचे स्वप्न साकार करीत वाटचाल करीत असलेल्या देशातील शेतक-यांवर असलेला दैववादी प्रवृत्तीचा पगडा अजुनही कायम असल्याचे आढळुन येते. भारतीय शेतक-यांचा शेतीकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा पारंपारीकच दिसून येतो. तो शेतीकडे व्यवसाय म्हणून न बघता रोजीरोटीचे व पोटापाण्याचे साधन म्हणून बघतो. शेतक-यांच्या या मानसिकतेमुळे शेतक-यांची आणि शेतीची अवस्था अत्यंत दयनिय झालेली आहे. आज शेती करतांना शेतक-यांमध्ये प्रखर असा उत्साह दिसून येत नाही. 'मरता क्या न करता या विवंचनेतून शेतकरी शेती करतांना दिसून येतो. ग्रामिण भागामध्ये पर्यायी उदरनिर्वाहाचे आणि रोजगाराचे साधन उपलब्ध नसल्याने नाईलाजाने शेतक-यांना शेती करावी लागत आहे. वर्ष दोन वर्षातून येणारी सततची नापिकी, वाढता उत्पादन खर्च, शेतमालाच्या किंमतीतील सततचे चढउतार, कर्जबाजारीपणा यामुळे अनेक शेतक-यांनी आत्महत्या

केलेल्या आहेत तर अनेक शेतक-यांनी स्वतःची शेती विकून टाकली आहे. रोजीरोटी आणि पोटपाण्याची सोय लावण्यासाठी अनेक शेतक-यांनी शहराकडे धाव घेतली आहे. गावाचे वातावरण निराशावादी होत आहे. गावे ओस पडत चालले आहे. आज भारत आर्थिक विकासाच्या बाबतीत जगातील पहिल्या दहा देशांमध्ये येतो. भारताकडे भविष्यातील आर्थिक महासत्ता म्हणून बघितले जाते. उद्याच्या जगाचे भारत नेतृत्व करू शकेल इतकी क्षमता भारत वेगाने विकसित करीत आहे. तरीसुध्दा समृध्दीकडे वाटचाल करणा-या देशामध्ये शेती आणि शेतक-यांची वाट अतिशय बिकट आहे. अशा देशामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शेतकरी आणि शेतीच्या विकासाबाबत सांगीतलेल्या आर्थिक विचारावर मार्गक्रमन केले त्यांनी सांगितलेली धोरणे अमलात आणल्यास त्याचा फायदा शेती आणि शेतक-यांना नक्कीच होईल असे वाटते.

**शेतकरी संघाची स्थापना**

भाऊसाहेब देशमुख हे शेती क्षेत्रातील सखोल ज्ञान असणारे एक अगक्रमी व्यक्तिमत्व होते. शेतकरी कुटुंबात जन्मल्याने भारतीय शेतक़-यांच्या जीवनातील सुख-दुःख, दारिद्य, अडी-अडचणी त्यांनी स्वतः अनुभवल्या होत्या. शेती व शेतक-यांच्या बाबतीतले दुःख त्यांना माहिती होते. त्यांना भारतीय शेती आणि शेतक-यांच्या आर्थिक व सामाजिक प्रश्नांची जाणीव होती. त्यामुळे त्यांनी शेतकरी सुखी व्हावा म्हणून शेतकरी व शेतीच्या विकासाबाबत केलेले कार्य उल्लेखनिय व खूप महत्त्वाचे आहे. त्यांनी शेती व शेतकरी जगला पाहिजे, शेतीचे प्रश्न सुटले पाहिजेत. यासाठी 1927 ला विजयादशमीच्या दिवशी शेतकरी संघ स्थापन केला. हा संघ सर्व जाती-जमातींच्या शेतक-यांसाठी आहे, विशिष्ट जातीपुरता तो मर्यादित नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली. शेतकरी संघाची स्थापना ही पंजाबराव देशमुखांच्या दूरदृष्टीचे पाऊल होते. त्यांची दृष्टी ही भविष्याचा वेध घेणारी होती. मागासलेली शेती आणि शेतक-यांचा रूढीवादी व दैववादी दृष्टीकोन शेतक-यांच्या दयनिय स्थितीला कारणीभूत आहेत असे त्यांना वाटत होते. भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारतातील ८० टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत हे लक्षात घेऊन भाऊसाहेबांनी कृषी विकास हाच भारतीय प्रगतीचा महत्त्वाचा टप्पा ठरविला आणि आपले सर्व प्रयत्न, सर्व जीवन त्याकरिता खर्ची घातले. शेतक-यांना दारिद्रयातून मुक्त केल्याशिवाय शेतकरी व देश समृद्ध होणार नाही आणि स्वतंत्र बनणार नाही असे त्यांना वाटत असे. त्यामुळे त्यांच्या मते जोपर्यंत आपण शेतीला आधुनिकतेची जोड देत नाही आणि शेतक-यांना रूढीवादी मानसिकतेतून बाहेर काढत नाही तोपर्यंत शेतीचा विकास शक्य नाही आणि शेतक-यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत सुधारणा होणार नाही. विकसित राष्ट्रांनी आधुनिक व तांत्रिक शेतीच्या प्रयोगातून शेती व शेतक-यांना समुध्द केले. ते भारततही शक्य आहे असे त्यांना वाटत होते.

**कृषीमंत्री म्हणून कार्य**

भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर केंद्रीय मंत्रिमंडळात पहिले कृषी मंत्री म्हणून काम करताना पंजाबराव देशमुख यांनी 1952 ते 1962 पर्यंत आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर कृषी क्षेत्रात अन्नधान्य, वन, मत्स्योत्पादन, ग्रामीण पुनर्रचना व कृषी उत्पादकांचे संघटन या क्षेत्रातील त्यांचे कार्य शेतक-यांच्या दृष्टीने अतिशय भरीव ठरले आहे. देशाच्या सध्याच्या कृषी क्षेत्राच्या प्रगतीत देशाचे प्रथम कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचा सिंहाचा वाटा आणि मोलाचे स्थान आहे. आज आपल्या देशाच्या कृषी क्षेत्रातील भरारीचा भक्कम पाया डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कृषी धोरण आणि विचारांमुळे घातला गेला आहे. दोन पंचवार्षिक योजनांसंदर्भात त्यांनी भारताचे अन्नस्वावलंबन साध्य केले. तिस-या पंचवार्षिक योजनेमध्ये घडून आलेल्या हरीत क्रांतीचा भक्कम पाया त्यांनी रोवला. शेतमालाचे योग्य भाव निर्धारित केले. नगदी पिकांना उत्तेजन दिले. शेतक-यांना कर्जे, पतपुरवठा करणा-या विविध राष्ट्रीय यंत्रणा त्यांनी उभारल्या. शेतक-यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अनेक कृषीविषयक संस्था

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

त्यांनी स्थापन केल्या. अनेक लोकोपयोगी कायदे करून त्यांची अंमलबजावणी केली आणि कृषी विकासाचा पाया घातला. शेतक-यांची कर्जातून मुक्त करणारा कर्ज लवाद विधेयक पारित करण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. या विधेयकाचा हजारो कर्जबाजारी शेतक-यांना फायदा झाला. लवादाच्या अखत्यारीत ऋणकोला कर्जात 46 टक्क्यांपर्यंत सूट मिळण्याची तरतूद केली होती.

**भारत कृषक समाजाची स्थापना**

फेब्रुवारी 1955 ला भाऊसाहेब देशमुख यांनी शेतक-यांना मार्गदर्शन करण्यासाठी भारत कृषक समाजाची स्थापना केली या स्थापनेमागील उद्देश असा होता की, शेतक-यांना आधुनिक पद्धतीने शेती करण्याचे प्रशिक्षण देणे, शेतीच्या नवनवीन प्रयोगांची माहिती देणे, कृषी प्रदर्शनी, चर्चासत्रे, संमेलने, समारंभ आयोजित करणे, राज्यातील तसेच परदेशातील शेतक-यांना परस्पर भेटीगाठीद्वारे एकमेकांना कृषीज्ञानाची देवाणघेवाण करता यावी. भाऊसाहेबांनी शेतक-यांच्या उद्धारासाठी अनेक योजना राबविल्यात, 1956 ला युवक कृषक समाज, 1961 ला शेतकरी बँक, 1953 ला अखिल भारतीय मधमाशी पालक संघटना, 1954 ला अखिल भारतीय अखाद्य तेलबिया संघटना, 1955 ला अन्न संघटना, 1955 ला अखिल भारतीय ताडगूळ महासंघ, 1958 ला राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी-विक्री संघ, 1960 ला भारत कृषक सहकारी अधिकोष इत्यादी अनेक संस्थाची उभारणी त्यांनी केली. शेतक-यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी मत्स्य, कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय असे शेतीपुरक जोडव्यवसाय करण्याचा सल्ला भाऊसाहेबांनी दिला होता.

**आधुनिक आणि तांत्रिक शेतीचा वापर**

शेती करताना शेतक-यांनी आधुनिक आणि तांत्रिक शेतीचा वापर करावा असे म्हटले आहे. याकरीता त्यांनी कोलंबो योजना प्रमाणे निरनिराळ्या देशात शेतकरी पाठविण्याची योजना आखली, तसे इंटर नॅशनल फार्म यूथ एक्सचेंज कार्यक्रम भारतात सुरु करुन अनेक शेतक-यांना दुस-या देशातील शेतीची लागवड पध्दती पाहण्याची व प्रात्याक्षिक करण्याची संधी मिळवून दिली. भाताचे उत्पादन वाढवण्यासाठी त्यांनी नवनवीन प्रयोग केले, यामध्ये त्यांनी जपानी पद्धतीचा प्रयोग केला होता आणि याच प्रयोगाच्या माहितीसाठी, त्यांनी २५६ केंद्र उभारली होती. त्यावेळेस खाजगी क्षेत्रात शेतीवर १९००० केंद्र उभारली होती. यात शेतक-यांना प्रशिक्षणासाठी ६३४ प्रशिक्षण केंद्राची सुविधा त्यांनी उपलब्ध करून दिली होती.

**उपसंहार**

शेतक-यांची दुष्काळ, नापिकी व शेतीसाठी घेतलेल्या कर्जापायी सावकार वर्गाकडून होत असलेली पिळवणूक, त्याद्वारे होणारी हालअपेष्टा दूर करणे व त्यांना जाचातून मुक्त करण्याची व्यवस्था उभी करणे याकडे स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी कोणीही लक्ष दिले नव्हते. डॉ. पंजाबराव देशमुख यांनी अशी चळवळ भारतात प्रथमच उभी केली. शेतकरी कर्जातून मुक्त झाला पाहिजे, यामध्ये पंजाबराव देशमुख यांचा मोठा सक्रिय सहभाग होता. कृषीमंत्री असताना, शेतक-यांच्या हिताच्या अनेक योजना आखून अमलात आणल्या. भारतीय शेतक-यांनी प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब करावा म्हणून, त्यांनी प्रयत्न केले. भाऊसाहेबांचे कृषी क्षेत्रातील कार्य भारतासारख्या कृषीप्रधान अर्थव्यवस्थेला प्रगतीच्या शिखरावर नेण्यासाठी उपयुक्त ठरते. त्यांचे कृषीविशयक विचार आजही भारतीय शेतक-यांना आणि शेतीच्या विकासासाठी दिशा देणारे आहेत. डॉ. पंजाबराव देषमुख हे कृषीक्रांतीचे अग्रदुत असून त्यांचे कार्य हिमालयापेक्षाही उतुंग आहे यात शंका नाही. डॉ. पंजाबराव देशमुखांनी शेती व शेतक-यांच्या विकासासाठी केलेले कार्य अनमोल आहे. डॉ. पंजाबराव देषमुख एक कुशल राजकारणी, समाजसेवक व त्याहीपेक्षा ते शेतक-यांचे कैवारी होते. त्यांच्या या कृषीविशयक कार्य व योगदानामुळे त्यांच्या कार्याला अभिवादन म्हणून 2000-2001 पासून महाराश्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत 'डॉ. पंजाबराव देशमुख कृषीरत्न पुरस्कार' देण्यात येतो. तसेच विदर्भातील

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

अकोला येथे असलेल्या कृषी विद्यापीठाला डॉ. पंजाबराव देशमुखांचे नाव देण्यात आले.

**संदर्भसुची**

1) डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक आर्थिक विचार, नभ प्रकाशन, रविंद्र ढाले

2) लोकमहर्षी भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

3) अर्थदीप स्मरणिका: संपादक, प्रा. दिलीप सोपान अर्जुने, ऋत प्रकाषन, जालना

4) Londhe S.R. ed. (1960): Dr.P.S.Deshmukh's Selected Speeches.

5) https://www.britannica.com/

6) https://www.encyclopedia.com/